दिनांक २६.०६.२०२५.

## प्रेस नोट

लोकसेवक १) प्रविण गोपाळराव राठोड, वय ४१ वर्षे, व्यवसाय नौकरी, पद पोह/२१७ नेमणुक पोस्टे बासंबा, रा. कांचन नगर, कारवाडी, हिंगोली. व आरोपी २) दत्ता बळीराम दराडे, वय ४६ वर्ष, व्यवसाय शेती व होमगार्ड, रा. वंजारवाडा, बासंबा, ता. जि. हिंगोली. यांनी १२,०००/— रूपये लाचेची मागणी करून दिनांक २५.०६.२०२५ रोजीचे सापळा कारवाई दरम्यान १०,०००/— रूपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरूद्ध पोलीस स्टेशन हिंगोली ग्रामीण जि. हिंगोली येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

पिडीत तक्रारदार यांनी दिनांक २५.०६.२०२५ रोजी तक्रार दिली की, तक्रारदार हे त्यांचे ऑटो रिक्षाने हिंगोली येथे प्रवाशी भाडे घेवुन आले असता, त्यांची पत्नी सौ. प्रतिमा यांनी तक्रारदार यांना फोन करून सांगीतले की, पो.स्टे. बासंबा येथील पोलीस आपल्या घरी आले व ते तुमच्या वडिलांना पोलीस स्टेशनला त्यांचे सोबत घेवुन गेले आहेत. त्यावरून तक्रारदार त्यांचे ऑटो रिक्षाने पोलीस स्टेशन बासंबा येथे गेले. बासंबा पोलीस स्टेशन येथे तक्रारदार व पोलीस हवालदार राठोड यांची समक्ष भेट झाली. तेथे तक्रारदार यांचे वडिल पोलीस स्टेशनला राठोड यांचे सोबत होते. तेव्हा पोलीस हवालदार राठोड हे तक्रारदार यांना म्हणाले की, तुमच्या वडिलांवर दारूची केस करणार आहे. दारूची केस करायची नसेल व गुन्हा दाखल करायचा नसेल तर, मला १०,०००/— रू द्यावे लागतील, असे म्हणुन लाचेची मागणी केले बाबत तक्रारदार यांची तक्रार प्राप्त झाली होती.

दिनांक २५.०६.२०२५ रोजी सदर तक्रारीची पंच साक्षीदार यांचे समक्ष लाच मागणी पडताळणी केली असता, यातील आरोपी क्रमांक १) प्रविण राठोड यांनी तक्रारदार यांचे वडिलांवर विना परवाना दारू विक्री करतो म्हणून केस न करण्यासाठी व वडिलांना सोडण्यासाठी आरोपी क्रमांक २) याचे मार्फतीने पंचासमक्ष १०,०००/— रू लाचेची मागणी करून लाच स्विकारण्यास सहमती दर्शवली. तसेच इथुन पुढं तुला दारू विकायची असेल तर प्रत्येक महिन्याला दोन—दोन हजार रूपये तुला द्यावे लागेल असे म्हणुन आरोपी क्रमांक १) याने तक्रारदाराकडे लाच मागणी केली.

दिनांक २५.०६.२०२५ रोजी यातील आरोपी क्रमांक १) प्रविण राठोड, पोलीस हवालदार यांनी लाचेची रक्कम घेवुन वाशिम—नांदेड रोडवरील ईसापुर पाटी येथे बोलविले. त्यावरून सापळयाचे आयोजन केले. तक्रारदार हे लाचेची रक्कम घेवुन आरोपी क्रमांक १) यांना देण्यासाठी वाशिम—नांदेड रोडवरील ईसापुर पाटी तालुका हिंगोली येथे गेले. तेव्हा आरोपी क्रमांक १) यांनी लाचेची रक्कम आरोपी क्रमांक २) यांचेकडे देण्यास सांगीतली. त्यावरून आरोपी क्रमांक २) यांनी तक्रारदार यांचेकडुन आरोपी क्रमांक १) याचे सांगणेवरून १०,०००/— रू लाचेची रक्कम स्वत: स्विकारली असता त्यांना लाचेच्या रक्कमेसह पकडण्यात आले. यातील तक्रारदार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नमुद आरोपींविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी मा. श्री संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, मा. डॉ. संजय तुंगार, अपर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली श्री विकास घनवट, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली यांनी पोलीस निरीक्षक, श्रीमती अनिता दिनकर, सपोउपनि महमद युनुस, विजय शुक्ला, पोह/भगवान मंडलीक, पोह/राजाराम फुपाटे, गजानन पवार, रविंद्र वरणे, गोविंद शिंदे, मपोह/योगीता अवचार, पो.शि./शिवाजी वाघ, अमोल जाधव, विनोद पुंडगे, चापोह/अकबर शेख, सर्व अॅन्टी करप्शन ब्युरो यांचे मदतीने यशस्वीपणे पुर्ण केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली तर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकिय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली यांचेशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहीजे असल्यास खालील नमुद क्रमांकावर संपर्क साधावा.

मा. संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मोबा. क्रमांक ९५४५५३१२३४
श्री विकास घनवट, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली, मोबा. क्रमांक ९८२२२५९९३२
टोल फ्रि क्रमांक १०६४, लॅन्ड लाईन क्रमांक ०२४५६—२२३०५५
व्हॉटसअॅप क्रमांक :— ९३५९१२८८८९.

कार्यालय पोलीस उप अधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली.

28/06

( विकास घनवट )
पोलीस उपअधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली.